# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : 020-25621205

Telephone No.: 020-25621205

Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग

P.G. Admission Section

Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय:– सन २०२५ –२६ साठी महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी १०० टक्के केंद्रशासन पुरस्कृत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीची अंमलबजावणीबाबत**

संदर्भ : शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र. ससं/उशि/पुवि/सीएसएस/२०२५–२६, दि. ३०/०६/२०२५.

या परिपत्रकाद्वारे मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/मा. विभागप्रमुख/मा. संचालक, सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग/संकुल यांना कळविण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.उशिसं--शिष्य/सीएस एस/२०२५–२६/E-1930568, दि. १७ जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक (Vocational) या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रधान मंत्री उच्चस्तर शिक्षण प्रोत्साहन योजने अंतर्गत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत राबविण्यात येते.

सदर शिष्यवृत्तीबाबत किमान पात्रता अटी, आवश्यक कागदपत्रे, ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती महाविद्यालय/संस्थेसाठीच्या सविस्तर सूचना विद्यापीठाचे परिपत्रक संदर्भ क्र. शै. प्रवेश/१५३५ दि. २०.०६.२०२५ मध्ये सविस्तरपणे नमूद करण्यात आलेल्या आहेत.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती २०२५–२६ योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्य/संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOD (Standard Operating Procedure) मा. संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरी सर्व महाविद्यालय/संस्था/विद्यापीठ विभाग यांनी सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण, पुणे या कार्यालयास देण्यात यावी.

गणेशखिंड पुणे – ७
संदर्भ : शै. प्रवेश/१६९६
दिनांक : ०४/०७/२०२५

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव,

सोबत:– शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांच्या दिंनाक ३०/०६/२०२५ पत्राची प्रत.

**प्रत:**

१. मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. विभागप्रमुख/मा. संचालक, सर्व शैक्षणिक विभाग/संकुल, प्रस्तुत विद्यापीठ.

यांना विनंती की या परिपत्रकाचा आशय सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणून द्यावा.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**17, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे 411 001**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – jdhepune.in
फोन नं 020-26127833 / 26051632 फॅक्स नं. 020-26051632

जा.क्र. – ससं/उशि/पुवि/सीएसएस/2025-26/ दिनांक : 30.06.2025

**परिपत्रक**

प्रति,

1. प्राचार्य,
   सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
   कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
   पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
   तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
2. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
3. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
4. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
5. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
6. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
7. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
8. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय – सन 2025-26 साठी महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी 100 टक्के केंद्रशासन पुरस्कृत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीची अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : - 1. केंद्र शासनाचे दि. 10.06.2025
2. मा. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. उशिसं – शिष्य / सी एस एस / 2025-26 / E – 1930568 दि . 17.06.2025.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक ( इयत्ता 12 वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक (Vocational) या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रधान मंत्री उच्चस्तर शिक्षण प्रोत्साहन योजने अंतर्गत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत राबविण्यात येते.

सदर शिष्यवृत्तीबाबत किमान पात्रता अटी, आवश्यक कागदपत्रे, ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती आणि विद्यापीठ, महाविद्यालय, संस्थेसाठी सविस्तर सूचना याबाबत सोबत जोडलेल्या मा. संचालनालयाचे दि. 17.06.2025 रोजीच्या परिपत्रकामध्ये सविस्तरपणे नमूद करण्यात आले आहे.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती 2025-26 योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी

संबंधित कुलसचिव / प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP ( Standard Operating Procedure) मा. संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तरी सर्व महाविद्यालय / संस्था / विद्यापीठे यांनी सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती या कार्यालयास देण्यात यावी.

Signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 01-07-2025 13:53:17

**(डॉ. अशोक उबाळे )**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे 16 यांना माहितीस्तव सविनय सादर.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, ४१२-ई, बहिरट पाटील चौक,**
**शिवाजी नगर, पुणे-४११०१६.**

web : www.dhepune.gov.in E-mail- schol.dhepune@gov.in

फोन नं -०२०/२९७०७०९८/२६१२६९३९

क्र.उशिंस -शिष्य/ सीएसएस/२०२५-२६/E-१९३०५६८ दिनांक- - /०६/२०२५

**परिपत्रक**

**विषय : सन २०२५-२६ साठी १०० टक्के केंद्रशासन पुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठीमधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीची अंमलबजावणी करणेबाबत..**

संदर्भ : केंद्रशासनाचे दिनांक १०.०६.२०२५ रोजीचे पत्र.

उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक (Vocational) या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रधान मंत्री उच्चस्तर शिक्षण प्रोत्साहन योजने अंतर्गत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी नविन मंजुरीचे आणि नुतनीकरणाचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरून (एन.एस.पी) मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजुरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merti List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजुर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात ( Under DBT Mode) जमा करण्यात येते.

केंद्रशासनामार्फत नवीन ( Fresh ) व नुतनीकरण ( Renewal ) विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१.१०.२०२५ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.

शिष्यवृत्ती बाबतच्या संकेतस्थळावरील मार्गदर्शक सुचना (Guidelines) व FAQs काळजीपूर्वक वाचनू त्यानुसार सर्व विद्यार्थी व महाविद्यालयांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नवीन/ सुधारीत प्राप्त सुचनांसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे व या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी अवलोकन करावे .

**किमान पात्रता अटी**

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा राहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/ स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.

३. अर्जदारच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रू ४.५ लाखा पेक्षा अधिक नसावे.

४. सदर शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे.

५. सदर शिष्यवृत्ती योजना कोणताही Diploma, Correspondence Course & Distance Education साठी लागू नाही.

६. केंद्रशासानाच्या नियमानुसार, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी व वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ४ वर्षे व कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत सदर शिष्यवृत्ती देय राहील.

**अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे**

**१. नवीन (Fresh)**

१. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका

२. पालकांचे राज्यशासनाचे प्राधिकृत केलेल्या अधिका-याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र

३. Bonafide certificate

**२.नुतनीकरण (Renewal)**

१.मागील वर्षाची गुणपत्रिका

२. Bonafide certificate

**नविन (Fresh) आणि नुतणीकरण (Renewal) विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती**

१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजुरीसाठी व नुतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम **मुदत ३१.१०.२०२५** ही आहे.

३. नवीन मंजुरीसाठी (Fresh) सदर योजनेसाठी HSC, CBSE व ICSE बोर्डचे टॉप २० Precentile यादीतील सर्व विद्यार्थी या योजनेचा अर्ज करण्यास पात्र असतील. सदर शिष्यवृत्तीसाठी उच्च शिक्षण कार्यालयामार्फत केवळ उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची HSC बोर्डचे विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

४. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक या पर्याचा वापर करून अर्ज भरावा.

५. तसेच शिष्यवृत्ती योजनेचा अर्ज भरणे करिता **एक वेळ नोंदणी क्रमांक** (OTR) व फेस-ऑथेंटिकेशन करणे आवश्यक असल्याने त्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सदरहू ओटीआर क्रमांकाद्वारे विद्यार्थ्यांनी नविन मंजूरीचे (Fresh) आणि नूतनीकरणाचे (Renewal) शिष्यवृत्ती अर्ज भरावेत.

६. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यांस शिष्यवृत्तीची रक्कम सुरळीत पणे जमा होण्यास मदत होईल.

७. विद्यार्थ्यांचा बँक खाते चालु स्थितीत असणे (Operative/Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरून शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.

८. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वत:च्या नावार असणे आवश्यक आहे, जॉईट खाते नसावे, खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरतेवेळी विद्यार्थ्यांकडून चुक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास/ न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील.

९. ऑनलाईनअर्ज भरण्यापुर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepages वरील SOP (Standard Operating Procedure) वाचून व समजून घेउनच अर्ज भरावा.

१०. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पुर्ण पणे भरून, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाही करिता सादर करावी.

११. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय/संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या/ संस्थेच्या मदतीने पुर्ण करून घ्यावा.

१२. एखादा पात्र विद्यार्थी नुतनिकरणासाठी अर्ज करावयाचा राहीला असेल तर पुढील वर्षी अर्ज करण्यास पात्र असेल. ( परंतु ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही)

१३. एखादया पात्र विद्यार्थ्यांचा नुतनिकरणासाठी अर्ज महाविद्यालय स्तरावर पडताळणी करावयाचा राहीला असेल तर सर्व अशा विद्यार्थ्यांना पुढील वर्षी योजनेसाठी अर्ज भरता येईल. ( परंतु ज्या वर्षाचा अर्ज पडताळणी करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)

१४.एखादा पात्र नुतनिकरण विद्यार्थ्यांने महाविद्यालय बदलुन दुस-या नवीन महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास अशा विद्यार्थ्यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर आपले महाविद्यालय बदलण्यासाठी उच्च शिक्षण, संचालनालय, पुणे यांचेकडून बदल करून घेतल्यानंतर अर्ज भरावा.

१५. नुतनिकरणाच्या विद्यार्थ्यांने अर्ज भरतेवेळी मागील वर्षी ५० टक्के घेणे आवश्यक असून सर्व विषयामध्ये उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (ATKT विद्यार्थी सदर योजनेचा अर्ज भरण्यास पात्र नाहीत.)

१६. तसेच विद्यार्थ्यांची ७५ टक्के उपस्थिती महाविद्यालयात असणे आवश्यक आहे व विद्यार्थ्यावर कोणताही गुन्हा दाखल नसावा.

**<u>विद्यापीठ/ महाविद्यालय/संस्थेसाठी सूचना</u>** :-

विद्यार्थ्यांनी नवीन मंजुरीचा (Fresh) किंवा नुतनीकरणाचा (Renewal) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांने अर्जा सोबत जोडलेल्या कागद पत्रांवरून अर्जांची छाननी करून ऑनलाईन मंजुरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी. तसेच मंजुर केलेले अर्ज व त्या सोबतची कागदपत्रे जतन करून ठेवण्यात यावीत तपासणी अंती समितीस उपलब्ध करून देण्यात यावी. संबंधित महाविद्यालयांना विभागाने दिलेल्या युजर. आय.डी. व पासवर्ड वापरून विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा मुदतीनंतर महाविद्यालय स्तरावरील सदरअर्ज अपात्र समजण्यात येतील.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०२५-२६ साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव/ प्राचार्य/ संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचना व SOP (standard operating procedure) www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील.

तरी आपल्या अधिनस्त महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, व विद्यापीठे यांना आपल्या स्तरावरून सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सुचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती या संचालनालयास देण्यात यावी.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 17-06-2025 13:55:46

**( डॉ. शैलेंद्र देवळाणकर )**
प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१६

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

प्रत,

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१
२. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे-०५
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई-०१
४. संचालक,आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१
५. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट राज्य, पुणे
६. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राजय (कृषी/अकृषित/तंत्र/ पशुविज्ञान/ आरोग्य विज्ञान)

२/- सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे परिपत्रक आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सुचना देण्यात याव्यात.

1-39/2018 NS-1
Government of India
Ministry of Education
Department of Higher Education
Scholarship Division

West Block -1, Wing 6, R.K. Puram, Sector -1
New Delhi-110066
Dated: 10th June, 2025

To

1. The Principal Secretary, 411 4th Floor, Mantralaya Annex, Madam Cama Road, Nariman Point, Mumbai – 400032 Maharashtra (Email: psec.higheredu@maharashtra.gov.in)

2. The Secretary, Directorate of Higher Education, Maharashtra State, Central Building,Near Sasoon Hospital, Pune, Maharashtra – 411001 (Email: scholarshipcss@gmail.com, schol.dhepune@gov.in)

**Subject: Bringing awareness for PM-USP Central Sector Scheme of Scholarship for College and University Students – regarding.**

Sir,

As you may be aware, this Department implements the **PM-USP Central Sector Scheme of Scholarship for College and University** Students across the nation.

2. The National Scholarships Portal (https://scholarships.gov.in) is now live for inviting applications from the students pursuing higher education. **The allocated quota for your state is 7417 and in the last Academic Year i.e. 2024-25, only 4421 Fresh applications were received.** Students who are in top 20th percentile in higher secondary from your state board and have annual income up to Rs. 4.5 lakhs are eligible to apply for this scholarship. Fewer applications will deprive the deserving students of your state from benefits of this Scheme.

3. In view of above, you are requested to spread awareness about the scheme by preparing information bulletin/pamphlets and share the same with the Principals of the schools/Institutions, Registrars of the Universities, publishing advertisement in the local newspapers, radio channels and uploading public notice regarding the scheme (copy enclosed) and User manual for the OTR and Scholarship Application Process (available on https://scholarships.gov.in/studentFAQs) on the official website of the respective Board/ Higher Education Department/Educational Institutions so that maximum number of students could avail the benefit of the scheme.

**Enc: a/a**

**Yours faithfully,**

Sangeet Kumar

**(Sangeet Kumar)**
**Under Secretary to the Government of India**